सकाळ




कराड : पैलवान अक्षय मंगवडे याच्या सत्कारप्रसंगी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. व्ही. एन. शिंदे, बाजीराव पाटील व मान्यवर.

# अक्षय मंगवडेला कुस्तीत सुवर्णपदक

पुनाळ : कोतोली (ता. पन्हाळा) येथील श्रीपतराव चौगुले आर्टस अॅण्ड सायन्स कॉलेज, माळवाडीचा विद्यार्थी व कुमार महाराष्ट्र केसरी पैलवान अक्षय मंगवडे याने कराड येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय स्पर्धेत १२५ किलो (ओपन) गटात गादी विभागात सुवर्णपदक मिळवले. त्याची ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी चॅम्पियनशिपसाठी सलग तिसऱ्यांदा निवड झाली. संस्थेचे अध्यक्ष डॉ. के. एस. चौगुले, सचिव शिवाजी पाटील, प्राचार्या डॉ. वंदना पाटील, जिमखानाप्रमुख डॉ. यू.एन. लाड यांचे मार्गदर्शन लाभले.

सकाळ




कराड : पैलवान अक्षय मंगवडे याच्या सत्कारप्रसंगी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. व्ही. एन. शिंदे, बाजीराव पाटील व मान्यवर.

# अक्षय मंगवडेला कुस्तीत सुवर्णपदक

पुनाळ : कोतोली (ता. पन्हाळा) येथील श्रीपतराव चौगुले आर्टस अॅण्ड सायन्स कॉलेज, माळवाडीचा विद्यार्थी व कुमार महाराष्ट्र केसरी पैलवान अक्षय मंगवडे याने कराड येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय स्पर्धेत १२५ किलो (ओपन) गटात गादी विभागात सुवर्णपदक मिळवले. त्याची ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी चॅम्पियनशिपसाठी सलग तिसऱ्यांदा निवड झाली. संस्थेचे अध्यक्ष डॉ. के. एस. चौगुले, सचिव शिवाजी पाटील, प्राचार्या डॉ. वंदना पाटील, जिमखानाप्रमुख डॉ. यू.एन. लाड यांचे मार्गदर्शन लाभले.

लोकमत



# राज्यपालांना निमंत्रित करण्यात अनादर नाही

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठामार्फत ५९व्या दीक्षान्त समारंभासाठी राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती यांना समारंभाचे अध्यक्ष म्हणून निमंत्रित करणे, हे 'महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा-२०१६'मधील तरतुदींनुसार कायद्याने बंधनकारक आहे. यामध्ये कोणत्याही प्रकारे लोकभावनेचा अनादर करण्याचा हेतू नाही, असा खुलासा शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे विद्यापीठामार्फत केला आहे.

'महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा-२०१६'च्या प्रकरण-३ मधील कलम-९ हे कुलपती व त्यांचे अधिकार याविषयीचे आहे. या कलम ९ (१) व कलम ९ (२) यांमधील तरतुदीनुसार कुलपती या नात्याने दीक्षान्त समारंभाची तारीख निश्चिती करण्यासाठी विद्यापीठ प्रशासनाकडून कुलपती कार्यालयास पत्र पाठविले होते. त्यामुळे विद्यापीठाने कायद्याचे पालन केले आहे. त्यामध्ये कोणत्याही लोकभावनेचा अनादर करण्याचा हेतू नाही, याची सर्व घटकांनी नोंद घ्यावी, असे आवाहन प्र. कुलसचिव डॉ. शिंदे यांनी केले आहे.

लोकमत



# राज्यपालांना निमंत्रित करण्यात अनादर नाही

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठामार्फत ५९व्या दीक्षान्त समारंभासाठी राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती यांना समारंभाचे अध्यक्ष म्हणून निमंत्रित करणे, हे 'महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा-२०१६'मधील तरतुदींनुसार कायद्याने बंधनकारक आहे. यामध्ये कोणत्याही प्रकारे लोकभावनेचा अनादर करण्याचा हेतू नाही, असा खुलासा शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे विद्यापीठामार्फत केला आहे.

'महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा-२०१६'च्या प्रकरण-३ मधील कलम-९ हे कुलपती व त्यांचे अधिकार याविषयीचे आहे. या कलम ९ (१) व कलम ९ (२) यांमधील तरतुदीनुसार कुलपती या नात्याने दीक्षान्त समारंभाची तारीख निश्चिती करण्यासाठी विद्यापीठ प्रशासनाकडून कुलपती कार्यालयास पत्र पाठविले होते. त्यामुळे विद्यापीठाने कायद्याचे पालन केले आहे. त्यामध्ये कोणत्याही लोकभावनेचा अनादर करण्याचा हेतू नाही, याची सर्व घटकांनी नोंद घ्यावी, असे आवाहन प्र. कुलसचिव डॉ. शिंदे यांनी केले आहे.

लोकमत

# ऑलिम्पिक टारगेट शूटिंग रेंजच्या नेमबाजांची निवड

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातर्फे शांतिनिकेतन सांगली येथे घेतलेल्या इंटर कॉलेज नेमबाजी स्पर्धेमध्ये ऑलिम्पिक टारगेट शूटिंग रेंजच्या चार खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी केली. त्यांची उत्तर प्रदेश राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेसाठी निवड झाली.

दहा मीटर एअर पिस्तूल प्रकारांतून शौर्य श्रेयांस डूणुंग यांनी ६०० पैकी ५६६ गुण मिळवून तृतीय, तर कणक प्रशांत शिंदे हिने ६०० पैकी ५७१ गुण मिळवून द्वितीय क्रमांक पटकावला. दहा मीटर एअर रायफल प्रकारात श्रावणी जितेंद्र पवार हिने ६०० पैकी ५९५ गुण मिळवून द्वितीय, तर प्रतीक आनंदा जोंग याने ६०० पैकी ५९८ गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकाविला. स्वामी विवेकानंद सुभारती युनिव्हर्सिटी उत्तर प्रदेश येथे होणाऱ्या ऑल इंडिया युनिव्हर्सिटी राष्ट्रीय नेमबाजीसाठी त्यांची निवड झाली. त्यांना विनय पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. तालुका क्रीडा अधिकारी सचिन चव्हाण, सुहास जगदाळे, सचिन पाटील यांचे प्रोत्साहन लाभले.

लोकमत

# ऑलिम्पिक टारगेट शूटिंग रेंजच्या नेमबाजांची निवड

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातर्फे शांतिनिकेतन सांगली येथे घेतलेल्या इंटर कॉलेज नेमबाजी स्पर्धेमध्ये ऑलिम्पिक टारगेट शूटिंग रेंजच्या चार खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी केली. त्यांची उत्तर प्रदेश राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेसाठी निवड झाली.

दहा मीटर एअर पिस्तूल प्रकारांतून शौर्य श्रेयांस डुणुंग यांनी ६०० पैकी ५६६ गुण मिळवून तृतीय, तर कणक प्रशांत शिंदे हिने ६०० पैकी ५७१ गुण मिळवून द्वितीय क्रमांक पटकावला. दहा मीटर एअर रायफल प्रकारात श्रावणी जितेंद्र पवार हिने ६०० पैकी ५९५ गुण मिळवून द्वितीय, तर प्रतीक आनंदा जोंग याने ६०० पैकी ५९८ गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकाविला. स्वामी विवेकानंद सुभारती युनिव्हर्सिटी उत्तर प्रदेश येथे होणाऱ्या ऑल इंडिया युनिव्हर्सिटी राष्ट्रीय नेमबाजीसाठी त्यांची निवड झाली. त्यांना विनय पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. तालुका क्रीडा अधिकारी सचिन चव्हाण, सुहास जगदाळे, सचिन पाटील यांचे प्रोत्साहन लाभले.

जनसंपर्क कक्ष
13 FEB 2023
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# व्यवस्थापन विकास कार्यक्रम १८ ला

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटमार्फत १८ फेब्रुवारीला एच. आर. मॅनेजरसाठी व्यवस्थापन विकास कार्यक्रम (मॅनेजमेंट डेव्हलपमेंट प्रोग्रॅम) होत आहे.

सयाजी हॉटेलमध्ये दुपारी तीन वा. होणाऱ्या कार्यक्रमाचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालयाचे ख्यातनाम वकील जमशेद कामा यांच्या हस्ते होणार आहे. कुलगुरू प्रा. डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती असेल.

'चेंजिंग लँडस्केप ऑफ लेबर लॉ फ्रेमवर्क अँड इट्स इम्पॅक्ट ऑन इंडस्ट्रीज'ही मध्यवर्ती संकल्पना आहे. यासाठी पुण्याचे कामगार कायदेतज्ज्ञ श्रीनिवास इनामती, मुंबई उच्च न्यायालयातील प्रसिद्ध वकील वरुण जोशी, कामगार आयुक्त, कोल्हापूरचे नामांकित वकील दीपक जोशी, ॲड. राजेंद्र चव्हाण, इंडस्ट्रियल हेल्थ अँड सेफ्टीचे जॉइंट डायरेक्टर सुरेश जोशी उपस्थित राहणार आहेत.

सुधारित कामगार कायद्याच्या अनुषंगाने तज्ज्ञांकडून चर्चा होणार आहे. पश्चिम महाराष्ट्रातील उद्योगांना कामगार कायद्याच्या अनुषंगाने अडचणी येत आहेत. त्यांचे निराकरण कसे करायचे, याची चर्चा होणार आहे. विविध कंपन्या व संस्थांच्या एच. आर. मॅनेजर यांनी सहभागी होणे अपेक्षित आहे. सहभागींनी विद्यापीठाच्या वेबसाइटवर रजिस्ट्रेशन करावे, असे आवाहन डॉ. नितीन माळी यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
13 FEB 2023
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# व्यवस्थापन विकास कार्यक्रम १८ ला

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटमार्फत १८ फेब्रुवारीला एच. आर. मॅनेजरसाठी व्यवस्थापन विकास कार्यक्रम (मॅनेजमेंट डेव्हलपमेंट प्रोग्रॅम) होत आहे.

सयाजी हॉटेलमध्ये दुपारी तीन वा. होणाऱ्या कार्यक्रमाचे उद्‌घाटन मुंबई उच्च न्यायालयाचे ख्यातनाम वकील जमशेद कामा यांच्या हस्ते होणार आहे. कुलगुरू प्रा. डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती असेल.

'चेंजिंग लँडस्केप ऑफ लेबर लॉ फ्रेमवर्क अँड इट्स इम्पॅक्ट ऑन इंडस्ट्रीज'ही मध्यवर्ती संकल्पना आहे. यासाठी पुण्याचे कामगार कायदेतज्ज्ञ श्रीनिवास इनामती, मुंबई उच्च न्यायालयातील प्रसिद्ध वकील वरुण जोशी, कामगार आयुक्त, कोल्हापूरचे नामांकित वकील दीपक जोशी, ॲड. राजेंद्र चव्हाण, इंडस्ट्रियल हेल्थ अँड सेफ्टीचे जॉइंट डायरेक्टर सुरेश जोशी उपस्थित राहणार आहेत.

सुधारित कामगार कायद्याच्या अनुषंगाने तज्ज्ञांकडून चर्चा होणार आहे. पश्चिम महाराष्ट्रातील उद्योगांना कामगार कायद्याच्या अनुषंगाने अडचणी येत आहेत. त्यांचे निराकरण कसे करायचे, याची चर्चा होणार आहे. विविध कंपन्या व संस्थांच्या एच. आर. मॅनेजर यांनी सहभागी होणे अपेक्षित आहे. सहभागींनी विद्यापीठाच्या वेबसाइटवर रजिस्ट्रेशन करावे, असे आवाहन डॉ. नितीन माळी यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
13 FEB 2023 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दीक्षांत समारंभास राज्यपालांना बोलावून लोकभावनेचा अनादर करण्याचा हेतू नाही

## शिवाजी विद्यापीठ कुलसचिवांकडून स्पष्टीकरण



**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने ५९ व्या दीक्षांत समारंभासाठी राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती यांना समारंभाचे अध्यक्ष म्हणून आमंत्रित करणे, ही बाब विद्यापीठ कायद्यातील तरतुदींचे पालन करणारी आहे. कायद्याने बंधनकारक असल्याने विद्यापीठ प्रशासनाने याचे पालन केले आहे. यात लोकभावनेचा अनादर करण्याचा हेतू नाही, असे परिपत्रक प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी प्रसिद्धीस दिले आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा-२०१६ च्या प्रकरण-३ मधील कलम ९ हे कुलपती व त्यांचे अधिकार याविषयीचे आहे. कलम (१) त्या-त्या वेळी असलेले महाराष्ट्राचे राज्यपाल हे प्रत्येक विद्यापीठाचे कुलपती असतील व ते विद्यापीठाचे प्रमुख असतील. कलम ९ (२) नुसार कुलपती जेव्हा उपस्थित असतील तेव्हा दीक्षांत समारंभाचे अध्यक्षस्थान भूषवतील व कुलगुरू यांना कोणत्याही प्रयोजनाकरिता आवश्यक असेल तेव्हा विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाची सभा बोलाविण्याचा निर्देश देतील.

याचप्रमाणे दीक्षांत समारंभासाठी बनविण्यात आलेल्या समान एकरूप परिनियमांमध्ये कुलपतीशी विचारविनिमय करून कुलगुरूकडून निश्चित केलेल्या तारखेस दीक्षांत समारंभ आयोजित करण्यात येईल, अशी तरतूद आहे. या तरतुदीनुसार कुलपतींकडे दीक्षांत समारंभाच्या तारखेची निश्चितीसाठीचे पत्र विद्यापीठ प्रशासनाकडून कुलपती कार्यालयास पाठविले होते. कायदा व त्यातील तरतुदीचे पालन करणे हे प्रत्येक विद्यापीठास बंधनकारक आहे. विद्यापीठाच्या कुलगुरूंनी तरतुदींचे काटेकोर पालन करण्याचे बंधन कुलगुरूंच्या कर्तव्यात नमूद केले आहे. कुलगुरू व प्रशासन यांनी दीक्षांत समारंभ आयोजित करताना कायद्याचे पालन केले आहे.

जनसंपर्क कक्ष
13 FEB 2023
पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दीक्षांत समारंभास राज्यपालांना बोलावून लोकभावनेचा अनादर करण्याचा हेतू नाही

## शिवाजी विद्यापीठ कुलसचिवांकडून स्पष्टीकरण

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने १९ व्या दीक्षांत समारंभासाठी राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती यांना समारंभाचे अध्यक्ष म्हणून आमंत्रित करणे, ही बाब विद्यापीठ कायद्यातील तरतुदींचे पालन करणारी आहे. कायद्याने बंधनकारक असल्याने विद्यापीठ प्रशासनाने याचे पालन केले आहे. यात लोकभावनेचा अनादर करण्याचा हेतू नाही, असे परिपत्रक प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी प्रसिद्धीस दिले आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा-२०१६ च्या प्रकरण-३ मधील कलम १ हे कुलपती व त्यांचे अधिकार याविषयीचे आहे. कलम (१) त्या-त्या वेळी असलेले महाराष्ट्राचे राज्यपाल हे



प्रत्येक विद्यापीठाचे कुलपती असतील व ते विद्यापीठाचे प्रमुख असतील. कलम ९ (२) नुसार कुलपती जेव्हा उपस्थित असतील तेव्हा दीक्षांत समारंभाचे अध्यक्षस्थान भूषवतील व कुलगुरू यांना कोणत्याही प्रयोजनाकरिता आवश्यक असेल तेव्हा विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाची सभा बोलाविण्याचा निर्देश देतील.

याचप्रमाणे दीक्षांत समारंभासाठी बनविण्यात आलेल्या समान एकरूप परिनियमांमध्ये कुलपतीशी विचारविनिमय करून कुलगुरूकडून निश्चित केलेल्या तारखेस दीक्षांत समारंभ आयोजित करण्यात येईल, अशी तरतूद आहे. या तरतुदीनुसार कुलपतींकडे दीक्षांत समारंभाच्या तारखेची निश्चितीसाठीचे पत्र विद्यापीठ प्रशासनाकडून कुलपती कार्यालयास पाठविले होते. कायदा व त्यातील तरतुदीचे पालन करणे हे प्रत्येक विद्यापीठास बंधनकारक आहे. विद्यापीठाच्या कुलगुरूंनी तरतुदींचे काटेकोर पालन करण्याचे बंधन कुलगुरूंच्या कर्तव्यात नमूद केले आहे. कुलगुरू व प्रशासन यांनी दीक्षांत समारंभ आयोजित करताना कायद्याचे पालन केले आहे.

13 FEB 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पदवी प्रमाणपत्रात विद्यार्थिनींचा टक्का अधिक

## विद्यापीठ एकूण ६६ हजार ४५७ विद्यार्थ्यांना देणार प्रमाणपत्रे

कोल्हापूर, ता. १२ : शिवाजी विद्यापीठाच्या गुरुवारी (ता. १६) होणाऱ्या दीक्षान्त सोहळ्यात यंदा ३३ हजार ७६५ विद्यार्थिनी, तर ३२ हजार ६९२ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे प्रदान केली जाणार आहेत. ४९ हजार ८६३ जणांना पोस्टाने प्रमाणपत्रे पाठवली जाणार आहेत. प्रत्यक्ष उपस्थित राहून प्रमाणपत्रे स्वीकारणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या १६ हजार ५९४ इतकी असून, यात ७ हजार ५१३ विद्यार्थी, तर ९ हजार ८१ विद्यार्थिनींचा समावेश आहे. दरम्यान, राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांचा राजीनामा मंजूर झाल्याने विद्यापीठ प्रशासन आता काय करणार, याकडे शिवप्रेमींचे लक्ष लागले आहे.

प्रशासनाकडून सोहळ्याची जय्यत तयारी करण्यात येत आहे. इंडियन कौन्सिल फॉर कल्चरल रिलेशनचे अध्यक्ष डॉ. विनय सहस्त्रबुद्धे सोहळ्याचे



प्रमुख पाहुणे आहेत. एकूण ६६ हजार ४५७ विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्रे दिली जाणार आहेत. प्रमाणपत्रांची छपाई पूर्ण झाली आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली. दरम्यान, भगतसिंह कोश्यारी कुलपती म्हणून अध्यक्षस्थान भूषवणार होते. शिवरायांबद्दल वारंवार अवमानकारक वक्तव्य केल्याने, त्यांच्याविरोधात संतापाची लाट शिवप्रेमींत उसळली होती. त्यांना विरोध करण्यासाठी गुरुवारी 'कोल्हापूर बंद'ची हाक देण्यात आली होती. त्यांचा आज राजीनामा मंजूर झाल्यानंतर शिवप्रेमींनी आनंदोत्सव साजरा केला. त्याचबरोबर प्रशासन आता कोणती भूमिका घेणार, याची उत्सुकता वाढली. याबाबत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले, 'राज्यपाल अर्थात कुलपती सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी असतात. कोश्यारी यांचा राजीनामा मंजूर झाल्याने आज राज्यपाल भवनाशी संपर्क साधला आहे. उद्या (ता. १४) भवनकडून अधिक माहिती मिळेल.'

### लोकभावनेचा अनादर करण्याचा हेतू नाही

■ शिवप्रेमींनी काल कुलगुरूंवर निशाणा साधला होता. शिवरायांचा वारंवार अवमान करणाऱ्या कोश्यारींना का आमंत्रित केले, असा प्रश्न उपस्थित केला. त्यावर प्रशासनाने प्रसिद्धी पत्रकाद्वारे भूमिका स्पष्ट केली. त्यात म्हटले आहे की, 'राज्यपाल अर्थात कुलपती यांना सोहळ्याचे अध्यक्ष म्हणून आमंत्रित करणे, ही बाब म्हणजे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा-२०१६ मधील तरतुदींचे पालन करणे आहे. कायद्याने बंधनकारक असलेल्या बाबींचे प्रशासनाकडून पालन करण्यात आले आहे. यात कोणत्याही प्रकारे लोकभावनेचा अनादर करण्याचा हेतू नाही.'

13 FEB 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पदवी प्रमाणपत्रात विद्यार्थिनींचा टक्का अधिक

## विद्यापीठ एकूण ६६ हजार ४५७ विद्यार्थ्यांना देणार प्रमाणपत्रे



कोल्हापूर, ता. १२ : शिवाजी विद्यापीठाच्या गुरुवारी (ता. १६) होणाऱ्या दीक्षान्त सोहळ्यात यंदा ३३ हजार ७६५ विद्यार्थिनी, तर ३२ हजार ६९२ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे प्रदान केली जाणार आहेत. ४९ हजार ८६३ जणांना पोस्टाने प्रमाणपत्रे पाठवली जाणार आहेत. प्रत्यक्ष उपस्थित राहून प्रमाणपत्रे स्वीकारणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या १६ हजार ५९४ इतकी असून, यात ७ हजार ५१३ विद्यार्थी, तर ९ हजार ८१ विद्यार्थिनींचा समावेश आहे. दरम्यान, राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांचा राजीनामा मंजूर झाल्याने विद्यापीठ प्रशासन आता काय करणार, याकडे शिवप्रेमींचे लक्ष लागले आहे.

प्रशासनाकडून सोहळ्याची जय्यत तयारी करण्यात येत आहे. इंडियन कौन्सिल फॉर कल्चरल रिलेशनचे अध्यक्ष डॉ. विनय सहस्रबुद्धे सोहळ्याचे प्रमुख पाहुणे आहेत. एकूण ६६ हजार ४५७ विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्रे दिली जाणार आहेत. प्रमाणपत्रांची छपाई पूर्ण झाली आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली. दरम्यान, भगतसिंह कोश्यारी कुलपती म्हणून अध्यक्षस्थान भूषवणार होते. शिवरायांबद्दल वारंवार अवमानकारक वक्तव्य केल्याने, त्यांच्याविरोधात संतापाची लाट शिवप्रेमींत उसळली होती. त्यांना विरोध करण्यासाठी गुरुवारी 'कोल्हापूर बंद'ची हाक देण्यात आली होती. त्यांचा आज राजीनामा मंजूर झाल्यानंतर शिवप्रेमींनी आनंदोत्सव साजरा केला. त्याचबरोबर प्रशासन आता कोणती भूमिका घेणार, याची उत्सुकता वाढली. याबाबत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले, 'राज्यपाल अर्थात कुलपती सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी असतात. कोश्यारी यांचा राजीनामा मंजूर झाल्याने आज राज्यपाल भवनाशी संपर्क साधला आहे. उद्या (ता. १४) भवनकडून अधिक माहिती मिळेल.'

### लोकभावनेचा अनादर करण्याचा हेतू नाही

▪ शिवप्रेमींनी काल कुलगुरूंवर निशाणा साधला होता. शिवरायांचा वारंवार अवमान करणाऱ्या कोश्यारींना का आमंत्रित केले, असा प्रश्न उपस्थित केला. त्यावर प्रशासनाने प्रसिद्धी पत्रकाद्वारे भूमिका स्पष्ट केली. त्यात म्हटले आहे की, 'राज्यपाल अर्थात कुलपती यांना सोहळ्याचे अध्यक्ष म्हणून आमंत्रित करणे, ही बाब म्हणजे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा-२०१६ मधील तरतुदींचे पालन करणे आहे. कायद्याने बंधनकारक असलेल्या बाबींचे प्रशासनाकडून पालन करण्यात आले आहे. यात कोणत्याही प्रकारे लोकभावनेचा अनादर करण्याचा हेतू नाही.'

सकाळ

# आंतरविभागीय महिला बेसबॉल स्पर्धेत 'महावीर'ला अजिंक्यपद

कोल्हापूर, ता. १२ : शिवाजी विद्यापीठांतर्गत आंतर विभागीय महिला बे सबॉल स्प र्धेत महावीर महावि द्यालयाच्या मुलींनी अजिंक्यपद पटकावले. डॉ. सुरेशकुमार मलिक यांच्या हस्ते, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांच्या उपस्थितीत उद्‌घाटन झाले. महावीर महाविद्यालयाने आयोजन केले होते.

अंतिम सामन्यात महावीर महाविद्यालयाच्या मुलींनी एस. जी. एम. कॉलेज, कऱ्हाडचा ६-४ असा पराभव केला. राष्ट्रीय खेळाडू स्वप्नाली वायदंडे, पिचर करिष्मा कुडचे, ऐश्वर्या पुरी, पल्लवी कांबळे, गायत्री जाधव यांनी अष्टपैलू खेळ केला. स्पर्धेतून गुवाहाटी येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ महिला बेसबॉल स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या संघाची निवड करण्यात आली.



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय महिला बेसबॉल स्पर्धेत विजेतेपद पटकावलेला महावीर महाविद्यालयाचा मुलींचा संघ. शेजारी मान्यवर.

सकाळ

# आंतरविभागीय महिला बेसबॉल स्पर्धेत 'महावीर'ला अजिंक्यपद

कोल्हापूर, ता. १२ : शिवाजी विद्यापीठांतर्गत आंतर विभागीय महिला बे सबॉल स्प र्धेत महावीर महावि द्यालयाच्या मुलींनी अजिंक्यपद पटकावले. डॉ. सुरेशकुमार मलिक यांच्या हस्ते, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांच्या उपस्थितीत उद्घाटन झाले. महावीर महाविद्यालयाने आयोजन केले होते.

अंतिम सामन्यात महावीर महाविद्यालयाच्या मुलींनी एस. जी. एम. कॉलेज, कऱ्हाडचा ६-४ असा पराभव केला. राष्ट्रीय खेळाडू स्वप्नाली वायदंडे, पिचर करिष्मा कुडचे, ऐश्वर्या पुरी, पल्लवी कांबळे, गायत्री जाधव यांनी अष्टपैलू खेळ केला. स्पर्धेतून गुवाहाटी येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ महिला बेसबॉल स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या संघाची निवड करण्यात आली.



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय महिला बेसबॉल स्पर्धेत विजेतेपद पटकावलेला महावीर महाविद्यालयाचा मुलींचा संघ. शेजारी मान्यवर.

जनसंपर्क कक्ष
13 FEB 2023 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातील विधी विभाग विद्यार्थ्यांची जिल्हा विधी सेवा प्राधिकरणास भेट

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या विधी विभागाच्या विद्यार्थ्यांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणास भेट देऊन 'मध्यस्थी' विषयावर पथनाट्य सादरीकरण केले.

कार्यक्रमास जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव प्रीतम पाटील, विद्यापीठाचे विधी विभाग प्रमुख डॉ. विवेक धुपदाळे, बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोव्याचे उपाध्यक्ष विवेक घाटगे, कौटुंबिक न्यायालयाच्या बार असोसिएशनचे अध्यक्ष राजेंद्र पाटील उपस्थित होते.

डॉ. धुपदाळे यांच्या हस्ते जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव प्रीतम पाटील यांचा सत्कार करण्यात आला. विधी सेवा प्राधिकरण कार्याची सविस्तर माहिती देऊन न्यायालयीन वाद तडजोड आणि आपापसात मिटवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे, असे प्रतिपादन प्रीतम पाटील यांनी केले.

डॉ. धुपदाळे यांनी वैकल्पिक वाद निवारणाबाबत मार्गदर्शन केले. विवेक घाडगे यांनी प्रकरणांमध्ये मध्यस्थी करताना वकिलांची भूमिका कशा पद्धतीने बजावली पाहिजे याबाबत मार्गदर्शन केले. राजेंद्र पाटील यांनी पथनाट्याद्वारे विधी सेवेची माहिती वंचित घटकापर्यंत कशा पद्धतीने पोहोचवता येईल याबाबत माहिती सांगितली. प्रास्ताविक प्रमोद दाभाडे यांनी केले. आभार प्रियंका गुरव यांनी मानले. यावेळी राजीव माने, राम गोपलानी, औदुंबर बनसोडे, जयदीप कदम, चंद्रकांत कुरणे, विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
13 FEB 2023 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातील विधी विभाग विद्यार्थ्यांची जिल्हा विधी सेवा प्राधिकरणास भेट

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या विधी विभागाच्या विद्यार्थ्यांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणास भेट देऊन 'मध्यस्थी' विषयावर पथनाट्य सादरीकरण केले.

कार्यक्रमास जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव प्रीतम पाटील, विद्यापीठाचे विधी विभाग प्रमुख डॉ. विवेक धुपदाळे, बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोव्याचे उपाध्यक्ष विवेक घाटगे, कौटुंबिक न्यायालयाच्या बार असोसिएशनचे अध्यक्ष राजेंद्र पाटील उपस्थित होते.

डॉ. धुपदाळे यांच्या हस्ते जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव प्रीतम पाटील यांचा सत्कार करण्यात आला. विधी सेवा प्राधिकरण कार्याची सविस्तर माहिती देऊन न्यायालयीन वाद तडजोड आणि आपापसात मिटवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे, असे प्रतिपादन प्रीतम पाटील यांनी केले.

डॉ. धुपदाळे यांनी वैकल्पिक वाद निवारणाबाबत मार्गदर्शन केले. विवेक घाडगे यांनी प्रकरणांमध्ये मध्यस्थी करताना वकिलांची भूमिका कशा पद्धतीने बजावली पाहिजे याबाबत मार्गदर्शन केले. राजेंद्र पाटील यांनी पथनाट्याद्वारे विधी सेवेची माहिती वंचित घटकापर्यंत कशा पद्धतीने पोहोचवता येईल याबाबत माहिती सांगितली. प्रास्ताविक प्रमोद दाभाडे यांनी केले. आभार प्रियंका गुरव यांनी मानले. यावेळी राजीव माने, राम गोपलानी, औदुंबर बनसोडे, जयदीप कदम, चंद्रकांत कुरणे, विद्यार्थी उपस्थित होते.

तरूण भारत

# नूतन राज्यपालांच्या निर्देशानुसार होणार दीक्षांत समारंभ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ १६ फेब्रुवारीला होणार आहे. या दीक्षांत समारंभासाठी राज्यपाल तथा कुलपती भगतसिंह कोश्यारी अध्यक्ष म्हणून उपस्थित राहणार होते. त्यांनी राजीनामा दिल्याने राष्ट्रपती कार्यालयाकडून रमेश बैस यांची नूतन राज्यपाल म्हणून नियुक्ती केली आहे. यामुळे शिवाजी विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ नूतन राज्यपालांच्या सूचनांप्रमाणे होणार आहे, अशी माहिती अधिकृत सुत्रांनी माहिती दिली आहे.

- **शिवाजी विद्यापीठात आज बैठकीत होणार चर्चा**

शिवाजी विद्यापीठाच्या १६ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या दीक्षांत समारंभाला भाजपचे खासदार विनय सहस्त्रबुध्दे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तर राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी राजीनामा दिला आहे. त्यामुळे दीक्षांत समारंभाच्या अध्यक्षपदी कोण उपस्थित राहणार यासंदर्भात आज (दि. १३) रोजी विद्यापीठाच्या बैठकीत चर्चा केली जाईल. दीक्षांत समारंभासंदर्भातील माहिती नूतन राज्यपालांना दिली जाणार आहे. त्यानंतर राज्यपाल कार्यालयाकडून आदेश आल्यानंतरच अंतिम निर्णय घेतला जाईल, अशी माहिती विद्यापीठाच्या अधिकृत सुत्रांनी दिली.

तरुण भारत

# नूतन राज्यपालांच्या निर्देशानुसार होणार दीक्षांत समारंभ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ १६ फेब्रुवारीला होणार आहे. या दीक्षांत समारंभासाठी राज्यपाल तथा कुलपती भगतसिंह कोश्यारी अध्यक्ष म्हणून उपस्थित राहणार होते. त्यांनी राजीनामा दिल्याने राष्ट्रपती कार्यालयाकडून रमेश बैस यांची नूतन राज्यपाल म्हणून नियुक्ती केली आहे. यामुळे शिवाजी विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ नूतन राज्यपालांच्या सूचनांप्रमाणे होणार आहे, अशी माहिति अधिकृत सुत्रांनी माहिति दिली आहे.

- **शिवाजी विद्यापीठात आज बैठकीत होणार चर्चा**

शिवाजी विद्यापीठाच्या १६ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या दीक्षांत समारंभाला भाजपचे खासदार विनय सहस्त्रबुध्दे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तर राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी राजीनामा दिला आहे. त्यामुळे दीक्षांत समारंभाच्या अध्यक्षपदी कोण उपस्थित राहणार यासंदर्भात आज (दि. १३) रोजी विद्यापीठाच्या बैठकीत चर्चा केली जाईल. दीक्षांत समारंभासंदर्भातील माहिती नूतन राज्यपालांना दिली जाणार आहे. त्यानंतर राज्यपाल कार्यालयाकडून आदेश आल्यानंतरच अंतिम निर्णय घेतला जाईल, अशी माहिती विद्यापीठाच्या अधिकृत सुत्रांनी दिली.

तरूण भारत

# करणसिंह पाटील यास शिवाजी विद्यापीठाची तीन पारितोषिके

## पदवी परिक्षेत राज्यशास्त्र विभागात विद्यापीठात प्रथम

**प्रतिनिधी**

कोल्हापूर

वारणा कापशी (ता. शाहूवाडी) येथील करणसिंह राजेंद्र पाटील याने बी.ए.च्या पदवी परीक्षेत राज्यशास्त्र विभागात शिवाजी विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळविला. पदवी परीक्षेसाठी असलेली विद्यापीठाची तीन पारितोषिके व शिष्यवृत्ती त्याने प्राप्त केली.



**करणसिंह पाटील**

पाटील याने द्वितीय व तृतीय या दोन्ही वर्षाची सलग शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती मिळविली. शिवाय दादा उंडाळकर मेमोरियल प्राईज, हिंमतबहादूर चव्हाण गुरुजी पारितोषिक व प्रोफेसर वासंती रासम पारितोषिक अशी तीन पारितोषिके मिळाली आहेत. श्री शहाजी छत्रपती कॉलेजचा तो विद्यार्थी आहे. डिसेंबर महिन्यात नागपूर येथे झालेल्या हिवाळी अधिवेशनात महाराष्ट्र शासनामार्फत संसदीय अभ्यास वर्गाचे आयोजन केले होते. शिवाजी विद्यापीठ प्रतिनिधी म्हणून करणसिंह याची सदर अभ्यास वर्गासाठी निवड झाली होती.

त्यास प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, प्रा. डॉ. राहुल मांडणीकर, प्रा. डॉ. विजय देठे यांचे मार्गदर्शन लाभले. सध्या फुलेवाडी कोल्हापूर येथे स्थायिक झालेल्या पाटील याचे या यशाबद्दल कौतुक होत आहे..

तरुण भारत

# करणसिंह पाटील यास शिवाजी विद्यापीठाची तीन पारितोषिके

## पदवी परिक्षेत राज्यशास्त्र विभागात विद्यापीठात प्रथम

**प्रतिनिधी**

कोल्हापूर

वारणा कापशी (ता. शाहूवाडी) येथील करणसिंह राजेंद्र पाटील याने बी.ए.च्या पदवी परीक्षेत राज्यशास्त्र विभागात शिवाजी विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळविला. पदवी परीक्षेसाठी असलेली विद्यापीठाची तीन पारितोषिके व शिष्यवृत्ती त्याने प्राप्त केली.



**करणसिंह पाटील**

पाटील याने द्वितीय व तृतीय या दोन्ही वर्षाची सलग शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती मिळविली. शिवाय दादा उंडाळकर मेमोरियल प्राईज, हिंमतबहादूर चव्हाण गुरुजी पारितोषिक व प्रोफेसर वासंती रासम पारितोषिक अशी तीन पारितोषिके मिळाली आहेत. श्री शहाजी छत्रपती कॉलेजचा तो विद्यार्थी आहे. डिसेंबर महिन्यात नागपूर येथे झालेल्या हिवाळी अधिवेशनात महाराष्ट्र शासनामार्फत संसदीय अभ्यास वर्गाचे आयोजन केले होते. शिवाजी विद्यापीठ प्रतिनिधी म्हणून करणसिंह याची सदर अभ्यास वर्गासाठी निवड झाली होती.

त्यास प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, प्रा. डॉ. राहुल मांडणीकर, प्रा. डॉ. विजय देठे यांचे मार्गदर्शन लाभले. सध्या फुलेवाडी कोल्हापूर येथे स्थायिक झालेल्या पाटील याचे या यशाबद्दल कौतुक होत आहे..